# माहिती अधिकारी अधिनियम,२००५ च्या कलम ४ अन्वये प्रसिध्दिसाठी तपशील.

**कलम ४ (१) बी (i) आयोगाची रचना,कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील.**

महाराष्ट राज्य अल्पसंख्याक आयोग हे महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक विभाग अधिनस्त आहे.

**कार्यालय प्रमुख :** सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग

**आयोगाची रचना :** महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग आधिनियम २००४ अन्वये महराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आली.

- राज्य शासनाच्या अधिसूचना क्रमांक राअआ-२००५/८९/प्र.क्र.१९/२००५, दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ अन्वये खालील समुदायांना अल्पसंख्याक म्हणून घोषित करण्यात आले आहे.
    1. **मुस्लिम**
    2. **खिश्चन**
    3. **शीख**
    4. **बौध्द**
    5. **पारशी**
    6. **जैन**
    7. **ज्यु**
- शासन अधिसूचना दिनांक ०२ जुलै, २०१६ अन्वये **ज्यु** समुदायांस अल्पसंख्याक म्हणून घोषित करण्यात आले आहे.
- शासन अधिसूचना दिनांक १४ ऑगस्ट, २०१२ अन्वये दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहे. (महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम २००४ यात सुधारणा करण्याकरीता अधिनियम.)

    १.या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग (सुधारणा) अधिनियम, २०१२ संक्षिप्त नाव. असे म्हणावे.

    २.महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ यांच्या कलम १० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल-

    **१० क.** आयोगास, कलम १० च्या पोट-कलम (१) खालील त्याचे कोणतेही कार्य पार पाडताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दाव्याची न्याय चौकशी करणाऱ्या दिवाणी १९०८ न्यायालयाचे अधिकार असतील, आणि ते विशेषत: पुढील बाबीसंबंधात असतील -

    (क) राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

    (ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्मावणे ;

    (ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

    (घ) कोणत्याही कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा दस्ताऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत मागवणे ; आणि

    (ड) साक्षीदारांची आणि दस्ताऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे.

**आयोगाची कार्ये व कर्तव्ये :**

- अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी भारताच्या संविधानामध्ये आणि राज्य विधानमंडळाच्या मंजूर केलेल्या कायद्यांमध्ये तरतूद करण्यात आलेल्या विविध संरक्षक उपाय योजनांच्या कार्यक्षमतेची तपासणी करणे.
- सर्व संरक्षक उपाययोजनांचे प्रभावी कार्यान्वयन व अंमलबजावणी होण्यासाठी खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने शिफारशी करणे.
- संविधान आणि संसदेने आणि राज्य विधानमंडळाने अधिनियमित केलेले कायदे यात तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजना आणि अल्पसंख्याकांसाठी असलेली राज्य शासनाची धोरणे आणि योजना यांच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवणे.
- अल्पसंख्याकाच्या बाबतीत होणारा भेदभाव टाळण्याच्या प्रश्नाबाबत अभ्यास, संशोधन व विश्लेषण करणे.
- शासन,शासकीय उपक्रम, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि प्रतिनिधित्व अपुरे असल्यास त्याबाबतीत इच्छित पातळी गाठण्यासाठी उपाय सुचविणे.
- राज्यात जातीय ऐक्याची सुनिश्चिती करण्यासाठी, ते राखण्यासाठी आणि त्याला उत्तेजन देण्यासाठी शिफारशी करणे.
- अल्पसंख्याकांचे कल्याण आणि विकास यांच्या दृष्टीने, आयोगाच्या मते महत्वाची असेल, अशा इतर कोणत्याही बाबीचा अभ्यास करणे आणि समुचित शिफारशी करणे.
- अल्पसंख्याकांच्या गाऱ्हाण्यांचा विचार करणे आणि त्यावर वेळोवेळी यथोचित उपाय सुचविणे.
- अल्पसंख्याकांना अधिकार व संरक्षक उपाययोजना यांपासून वंचित ठेवण्यासंबंधातील विनिर्दिष्ट तक्रारींमध्ये लक्ष घालणे आणि अशा बाबी समुचित प्रधिकरणाकडे नेणे.
- अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी असलेल्या पंतप्रधान १५ कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे समन्वय व पर्यवेक्षण करणे.

**कलम ४ (१) बी (ii)** : पदाधिकारी

शासन अधिसुचना क्र.राअआ-२०२३/प्र.क्र.८७/का-९, दिनांक ३ जुलै, २०२४ अन्वये अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची नियुक्त शासनामार्फत करण्यात आली आहे.

शासन अधिसूचना क्र.राअआ-२०२३/प्र.क्र.८७/का-९, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ अन्वये सदस्य (९) यांची नियुक्त शासनामार्फत करण्यात आली आहे.

**<u>कलम ४ (१) बी (iii)</u>** तक्रार/निवेदनांची कार्यवाही पध्दत खालील प्रमाणे :

तक्रारी आवक विभागात नोंदवूण विहित नमुन्यात अहवाल मागविणयासठी संबंधित विभाग/व्यक्ती पाठविणे.

**<u>कलम ४ (१) बी (iv-v)</u> : कार्यालयीन संचालनासाठीचे कायदे व नियम**

- महाराष्ट राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४
- अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय व परिपत्रके
- महाराष्ट्र नागरी सेवा नियम
- महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम,२००५

**<u>कलम ४ (१) बी (vi)</u> : धारित असलेल्या कागदपत्रांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | वर्गीकरण | कागदपत्रांचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|
| १. | तक्रारी व निवेदने | संचिका व नोंदवही | अल्पसंख्याक हक्क उल्लंघनाबाबत प्राप्त तक्रारीवर अर्ज. |
| २. | माहिती अधिकारी अर्ज | संचिका व नोंदवही | आर.टी.आय अंतर्गत प्राप्त अर्ज, अपील व त्यांचा निपटारा |
| ३. | प्रशासन व आस्थापना | संचिका व सेवा पुस्तके | कर्मचारी आस्थापना, पदभरती व सेवाविषयक बाबी. |
| ४. | लेखा व वित्त | रोकड वही, प्रमाणक, नोंदवही | अंदाजपत्रकीय तरतूद, खर्च विवरण व लेखापरिक्षण अहवाल. |

**<u>कलम ४ (१) बी (vii-viii)</u> : सार्वजनिक विचारविनिमय व समित्या**

- नागरिकांशी विचारविनिमय : आयोगामार्फत आयोजित सुनावणी व दौऱ्यांदरम्यान अल्पसंख्याक संघटनांच्या प्रतिनिधींशी व नागरिकांशी संवाद साधला जातो. धोरणात्मक निर्णय शासन स्तरावर घेतले जातात.
- समित्या/ परिषद : आयोगांतर्गत कोणतीही कायमस्वरुपी सल्लागार समिती स्थापन कलेली नाही. आवश्यकतेनुसार विशिष्ट विषयांच्या चौकशीसाठी तज्ञ समित्या गठित केल्या जातात.

## <u>कलम ४ (१) बी (ix-x)</u> : पदाधिकारी व अधिकारी / कर्मचारी नामावली

| अ.क्र. | नाव | पदनाम | संपर्क |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्यारे खान | अध्यक्ष (मंत्री दर्जा) | ०२२-२२६५००८५/२२६१०१५६ |
| २. | श्री.चेतन देढीया | उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) | |
| ३. | श्री.ललीत गांधी | सदस्य | |
| ४. | श्री.वसीम बुऱ्हा | सदस्य | |
| ५. | श्री.गुलाम रसुल शेख | सदस्य | |
| ६. | श्री.अहमद देशमुख | सदस्य | |
| ७. | श्री.वसीम शेख | सदस्य | |
| ८. | श्री.चरणदिप सिंह | सदस्य | |
| ९. | श्री.संजय सुराणा | सदस्य | |
| १०. | श्री.हुसेन बाबुलाल शेख | सदस्य | |
| ११. | श्री.अफसार शेख | सदस्य | |
| १२. | श्री.मिनाज मुल्ला | सचिव | |
| १३. | श्री.सत्तार ग.अत्तार | सहा.लेखाधिकारी | |
| १४. | श्री.गणेश सुरवसे | लघुलेखक (उ.श्रे) | |
| १५. | श्रीमती.दर्शना उरणकर | सहाय्यक | |
| १६. | श्रीमती.स्मिता नरे | लघुलेखक (नि.श्रे) | |

## <u>कलम ४ (१) बी (xii-xiii)</u> :

(Xii) सबसिडी कार्यरत : थेट सबसीडी नाही. (अल्पसंख्याक विकास विभागामार्फत योजना राबविल्या जातात)

(xiii). दिलेल्या सवलती व परवाने : लागू नाही.

(xiv). तांत्रिक स्वरूपातील माहिती : महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाशी संबधित नियम अथवा सूचना व कायद्याची माहिती आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (https:/msmc.maharashtra.gov.in/) व शासन निर्णयासाठी https://maharashtra.gov.in/) या महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(xv). वाचनालय/ वाचन कक्ष सुविधा : कार्यालयात स्वतंत्र सार्वजनिक वाचनालय उपलब्ध नाही. (कार्यालयात नियमित वर्तमानपत्रे उपलब्ध असतात.)

**<u>कलम ४ (१) बी (xvi)</u> : माहितीचा अधिकार**

| प्रथम अपिली अधिकारी (FAA) | जनमाहिती अधिकारी (PIO) |
|---|---|
| सचिव, श्री.मिनाज मुल्ला<br>महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई.<br>दुरध्वनी क्र : ०२२-२२६५००८५<br>ई-मेल : smc_mah२०००@yahoo.com | सहाय्यक, श्रीमती.दर्शना उरणकर<br>महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई.<br>दुरध्वनी क्र : ०२२-२२६५००८५<br>ई-मेल : smc_mah२०००@yahoo.com |